# नारळासाठी खत, पाणी आणि इतर व्यवस्थापन

**पावसाळयामध्ये नारळ झाडाना चांगले पाणी मिळते. तसेच प्रगतशील शेतकरी आवश्यकतेनुसार खतेही देतात. त्यामूळे या कालावधीत नारळाला चांगली फलधारणा दिसून येते. पावसाळयानंतर लगेच पाणी आणि खत व्यवस्थापन याबाबीकडे लक्ष पुरविणे अत्यंत आवश्यक असते. याचे प्रमुख कारण म्हणजे नारळाला सर्वसाधारणपणे वर्षाला बारा पाने येतात. तसेच पुर्ण वाढलेल्या प्रत्येक झाडाच्या पानातून पोय (फुलोरा) येते. त्याचे पुढे फळात रूपांतर होते. नारळाचे झाड, खत पाणी, आच्छादन करणे इत्यासाठी उत्तम प्रतिसाद देते. तसेच योग्य एकात्मिक व्यवस्थापनामूळे सशक्त राहते आणि किड तसेच रोगांचा कमी प्रादुर्भाव होतो.**

## -:खत व्यवस्थापन:-

बाणवली जातीचे माडांना नत्र, स्फुरद आणि पालाश खतांच्या वेगवेगळया मात्रा दिल्या असता उत्पादनात होणारे परिणाम तपासण्याचा प्रयोग सन १९५८ साली सुरू केला होता आणि सन १९८३ साली तो पूर्ण करण्यात आला त्याच्या निष्कर्षावरून असे दिसून आले की खते न दिलेल्या झाडांपासून प्रति माड प्रति वर्ष १५ नारळ मिळाले, तर पूर्ण खतांचा हप्ता दिला असता ९७ नारळ उत्पन्न मिळाले. या निष्कर्षावर आधारीत प्रत्येक लागत्या नारळाचे झाडास १ किलो नत्र, १/२ किलो स्फुरद आणि १ किलो पालाश खताची मात्रा तीन समान हप्त्यात (जून, ऑक्टोबर आणि फेब्रुवारी) देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**नारळाला लागवडीपासून दरवर्षी खालीलप्रमाणे खतांची मात्रा देणे आवश्यक आहे**

| अ. क्र | वर्ष | कंपोस्ट/शेणखत (किलो) | युरीया (ग्रॅम) | सिंगल सुपर फॉस्फेट (ग्रॅम) | म्युरेट ऑफ पोटॅश (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पहीले वर्ष | १ घमेले | ५०० | ६०० | ३२० |
| २ | दुसरे वर्ष | २ घमेली | १००० | १२०० | ६४० |
| ३ | तिसरे वर्ष | ३ घमेली | १५०० | १८०० | ९६० |
| ४ | चौथे वर्ष | ४ घमेली | २००० | २४०० | १२८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | पाचवे वर्ष | ५ घमेली | २२२५ | ३००० | १६०० |

वरील खते उपलब्ध न झाल्यास संपुर्णा (१९:१९:१९) सहा किलो किंवा सुफला (१५:१५:१५) साडे सात किलो किंवा सेंद्रीय खत (५:१०:५) १५ किलो प्रति माड तीन वेळा विभागून द्यावे. वरील खतांपैकी युरीया व म्युरेट ऑफ पोटॅश ही खते वर्षातून तीन वेळा (जून – ऑक्टोबर – फेब्रुवारी) विभागून द्यावीत तर सिंगल सुपर फॉस्फेट व शेणखताचा पुर्ण हप्ता जूनमध्ये द्यावा. या खतांसोबत ऑर्मिकेम हे सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत प्रत्येक हप्त्याला अर्धा किलो द्यावे. तसेच सप्टेंबर – ऑक्टोबर मध्ये प्रती माड ५ किलो निंबोळी पेंड द्यावी.

## <u>संकरीत जातींना खताची शिफारस</u>

डि x टी या संकरीत नारळ जातीस तक्ता क्रं. १ प्रमाणे खतांच्या मात्रांची शिफारस करण्यात येत आहे.

**तक्ता क्रं. १: डि x टी या संकरीत जातीस द्यावयाची खते**

| **अ.क्र** | **वय** | **कंपोस्ट शेणखत (किलो)** | **नत्र, स्फुरद आणि पालाश खतांची मात्रा (प्रती माड प्रती वर्ष)** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **नत्र (ग्रॅम)** | **स्फुरद (ग्रॅम)** | **पालाश (ग्रॅम)** |
| १. | १ | १० | २०० | १०० | ४०० |
| २. | २ | २० | ४०० | २०० | ८०० |
| ३. | ३ | ३० | ६०० | ३०० | १२०० |
| ४. | ४ | ४० | ८०० | ४०० | १६०० |
| ५. | ५ | ५० | १००० | ५०० | २००० |

**संकरीत नारळाला लागवडीपासून दरवर्षी खालीलप्रमाणे खतांची मात्रा देणे आवश्यक आहे**

| **अ. क्र** | **वर्ष** | **कंपोस्ट/शेणखत (किलो)** | **युरीया (ग्रॅम)** | **सिंगल सुपर फॉस्फेट (ग्रॅम)** | **म्युरेट ऑफ पोटॅश (ग्रॅम)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पहीले वर्ष | १ घमेले | ५०० | ६०० | ६४० |
| २ | दुसरे वर्ष | २ घमेली | १००० | १२०० | १२८० |
| ३ | तिसरे वर्ष | ३ घमेली | १५०० | १८०० | १९२० |
| ४ | चौथे वर्ष | ४ घमेली | २००० | २४०० | २५६० |
| ५ | पाचवे वर्ष | ५ घमेली | २२२५ | ३००० | ३२०० |

वरील खतांपैकी १/३ नत्र आणि पालाश, संपूर्ण स्फुरद आणि कंपोस्ट/शेणखत जून माहिन्यात द्यावे. शिल्लक २/३ नत्र आणि पालाश विभागून ऑक्टोबर आणि फेब्रुवारी माहिन्यात द्यावे.

खते झाडाचे सभोवताली पहिले वर्ष — १ फुट, दुसरे वर्ष — २ फुट, तिसरे वर्ष — ३ फुट, चौथे वर्ष — ४ फुट व पाचवे वर्ष ५ ते ६ फुट अंतरापर्यंत (खोडापासून) गोलाकार द्यावीत.




## सुक्ष्म अन्नद्रव्याची शिफारस

सुक्ष्म द्रव्य खतांच्या प्रयोगाच्या अंतर्गत शिफारस केलेल्या खतांसोबत १.५ किलो ऑर्मिकेम हे सुक्ष्मद्रव्ये असलेले खत बाणवली माडांना दिले असता प्रती माड १२९ नारळ मिळसले तर निव्वळ शिफारस केलेले खत दिले असता प्रती माड ९७ नारळ मिळाले. त्यावरून लागत्या माडांना १.५ किलो ऑर्मिकेम सुक्ष्मद्रव्य खताची मात्रा दिन समान हप्त्यात देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

## नारळामध्ये सेंद्रीय खताची शिफारस

सेंद्रीय पध्दतीने नारळ लागवड करणेसाठी प्रत्येक उत्पादनक्षम नारळ झाडास मे माहिन्याच्या शेवटच्या आठवडयात किंवा जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात झावळा आणि बागेत उपलब्ध होणारे इतर वनस्पतीजन्य साहित्य यापासून तयार केलेले ५० किलो गांडुळखत आळे पध्दतीने देण्याची शिफारस महाराष्ट्रातील कोकण विभागासाठी करण्यात येत आहे.

## संकरीत जातींवरील सेंद्रीय खताची शिफारस

कोकण विभागामध्ये डि **X** टी या संकरीत जातीच्या नारळ झाडापासून अधिक

उत्पन्न मिळविण्यासाठी प्रती झाडास १ किलो नत्र, ०.५ किलो स्फुरद, २किलो पालाश खताच्या मात्रेची शिफारस करण्यात येत आहे. या मात्रेतील अर्ध्या नत्राची मात्रा २५ किलो गांडुळखताद्वारे दयावी आणि उर्वरत नत्र, स्फुरद व पालाशाची मात्रा रासायनिक खताद्वारे द्यावी. गांडुळखत आणि स्फुरदची संपूर्ण मात्रा जून मध्ये द्यावी तर नत्र आणि पालाश खतांची (रासायनिक) मात्रा जून, ऑक्टोबर आणि फेब्रुवारी मध्ये समप्रमाणात विभागून द्यावी.

**नारळ मसालापिके आंतरमशागत प्रक्षेत्रातील गांडुळखत निर्मितीची शिफारस**

नारळ या पिकापासून ३.४ ते ५.१ टन काडीकचरा (झाडी, फोका व इतर) उपलब्ध होतो. तर विविध मसाले पिकांपासून १६१ ते ४४५० किलो काडीकचरा प्रती हेक्टर उपलब्ध होतो.

सदर उपलब्ध होणारा काडीकच—यापासून गांडुळखताची निर्मिती केल्यास एक हेक्टर बागेतून २ ते ३ टन गांडुळखत उपलब्ध होते तर मसाले पिकांपासून ४८ किलो ते १.५ टन गांडुळखत उपलब्ध होते.

सदर गांडुळखतांच्या अन्नद्रव्यांचा विचार करता त्यापासून प्रती हेक्टर ४३.६२ किलो नत्र, ६.६४ किलो स्फुरद, ३०.१३ किलो पालाश, २१.८१ किलो कॅल्शियम व १६.५६ किलो मॅग्नेशियम एवढी अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. तसेच प्रती माडाचा विचार करता या खतापासून ३३ टक्के नत्र, ३.६७ टक्के स्फुरद आणि २२.९६ टक्के पालाश खताची गरज भासते. तर २०.४० टक्के नत्र, २.७ टक्के स्फुरद आणि २०.६७ टक्के पालाश या खताची मसाला पिकांची गरज भासते.

**ठिबक सिंचनाद्वारे खते देण्याची शिफारस**

नारळासाठी शिफारस करण्यात आलेल्या १ किलो नत्र ०.५ किलो स्फुरद आणि १ किलो पालाश खताची मात्रा ठिबक सिंचनाद्वारे एकूण आठ समान हप्त्यामध्ये ऑक्टोबर ते मे माहिन्यात देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## ❖ छायाचित्रे























## ब) पाणी व्यवस्थापन :

नारळाची ८० ते ८५ टक्के मुळे नारळ बुंध्यापासून ६ फुट अंतरापर्यंत पसरलेली असतात. त्यामूळे ठिबक सिंचनाव्दारे पाणी देताना नारळाच्या बुंध्याच्या सभोवताली पाणी मिळेल याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी ठिबक सिंचनाचा पाईप नारळाचे बुंध्यापासून ३.५ फुटावर गोलाकार फिरवावा व त्याला ६ ड्रिपर ठेवावेत. जमिनीच्या मगदुराप्रमाणे झाडास ठिबक सिंचनाव्दारे ऑक्टोबर ते जानेवारी – ३० लिटर तर फेब्रुवारी ते मे ४० लीटर पाणी द्यावे.



**क) आच्छादन करणे :**

नारळाच्या बागेत नारळाचे झाप, काथ्या, सोडणे, त्याचा भुसा, खराब झालेल्या पोई तसेच आंतरपिकांचे अवशेष भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात. त्याचा उपयोग पाणी देण्याच्या जागेवर आच्छादनासाठी केल्यास बाष्पीभवन होवून वाया जाणारे पाणी वाचते तेच झाडाला मिळते, जमिनीचे तापमान कमी ठेवता येते. तसेच आच्छादन कुजल्यावर त्याचा झाडास फायदा होतो आणि तण नियंत्रण करता येते.